# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी यांचे कार्यालय.

वाचा : १– मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनीय पत्र क. बी(जन)५६०१/५७/२०१८ /१४२०. दिनांक २१ नोव्हेंबर, २०१८.

२– दिनांक २६–११–२०१८ रोजी कनिष्ठ लिपीक या पदाची निवड/प्रतिक्षा यादी सन–२०१८.

---

## कार्यालयीन आदेश क. ( 962 )

मा. उच्च न्यायालयाचे संदर्भीय पत्र क. १ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी मार्फत दिनांक २६–११–२०१८ रोजी कनिष्ठ लिपीक या पदाची निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. कनिष्ठ लिपीक पदाच्या निवड/प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना नेमणुक देणे बाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी हे खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहेत.

सदरचे आदेश हे दिनांक ०१ जुन, २०२१ पासुन अंमलात येतील.

| अ.क्र. | निवड/प्रतिक्षा यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवाराचे नांव व कार्यरत असेल्या कर्मचा–यांची नावे | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| १* | श्री. शिवाजी गणेश कुबडे, कनिष्ठ लिपीक पदाची प्रतिक्षा/निवड यादी सन–२०१८ मधील अ.क्र. (७८) वरील उमेदवार. | यांना कनिष्ठ लिपीक या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यांत येत असुन त्यांची नेमणुक दिवाणी न्यायाधीश क. स्तर, हिंगोली यांचे आस्थापनेवर श्री. एस. डी. शिंदे, कनिष्ठ लिपीक यांची बदली झाल्यामुळे त्यांचे ठिकाणी करण्यांत येत आहे. |
| २* | श्री. राजाचंद्रसेन शंकरराव जंगले, कनिष्ठ लिपीक पदाची प्रतिक्षा/निवड यादी सन–२०१८ मधील अ.क्र. (७९) वरील उमेदवार. | यांना कनिष्ठ लिपीक या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यांत येत असुन त्यांची नेमणुक दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कळमनुरी यांचे आस्थापनेवर श्री. ए. के. फुलपगार, कनिष्ठ लिपीक यांची बदली झाल्यामुळे त्यांचे ठिकाणी करण्यांत येत आहे. |

### नेमणुकीच्या अटी व शर्ती :

०१) उपरोक्त नवनियुक्त उमेदवार कामावर रुजु झाल्यानंतर कार्यालय प्रमुखांनी उमेदवारांस एकनिष्ठतेची शपथ दयावी व वैदयकीय दृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र घ्यावे आणि उमेदवारांकडुन नियमानुसार आवश्यक ती कागदपत्रे घ्यावीत. उमेदवाराने एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांनी एक महिन्याचे वेतन सरकारजमा करावे.

०२) उपरोक्त नवनियुक्त उमेदवारांना शासन निर्णय वित्त विभाग क. अंनियो–१००५/१२६ /सेवा–४. दिनांक ३१–१०–२००५ आणि शासन निर्णय क. अंनियो–१००७/१८ /सेवा–४. दिनांक ०७–०७–२००७ नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील.

०३) त्या अनुषंगाने अ.क्र. ७८* व ७९* वरील निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची कनिष्ठ लिपीक या पदावर तदर्थ स्वरूपात (Ad-hoc basis) करण्यात आलेली आहे. म्हणून त्यांनी मराठी टंकलेखन परीक्षा नियुक्ती मिळाल्यापासुन एक वर्षाचे आत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे, अन्यथा त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल त्यांनी खाली दर्शविल्याप्रमाणे तदर्थ तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणुकीचे बंधपत्र सादर करावे.

## बंधपत्र

मी ------------------ बंधपत्र लिहून देतो की, माझी कनिष्ठ लिपीक या पदावर निवड/प्रतिक्षा यादीमध्ये अ.क्र. ----- वर खालील अटीच्या अधिन राहुन निवड झालेली आहे.

१– माझी कनिष्ठ लिपीक या पदावरील नेमणूक ही तदर्थ **[Adhoc Basis]** स्वरुपाची राहील.

२– कनिष्ठ लिपीक या पदासाठी निवड प्रक्रियेच्या वेळी घेण्यांत आलेल्या मराठी टंकलेखन परीक्षेमध्ये ३५ टक्के (खुल्या प्रवर्गासाठी) पेक्षा कमी गुण प्राप्त झाले असल्यामुळे सदरची परीक्षा ही माझी उपरोक्त पदावर नियुक्ती झाल्यानंतर ०१ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे माझेवर बंधनकारक राहील. सदर परीक्षेमध्ये मला ३५ टक्केपेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास माझी शासकीय सेवा तात्काळ संपुष्टात येईल याची मला कल्पना आहे.

करिता हे बंधपत्र लिहुन देतो.

दिनांक :    /    /२०२१.                स्वाक्षरी/–
ठिकाण :                उमेदवाराचे नाव
प्रतिक्षा यादीतील अ.क्र. व संपूर्ण पत्ता :

०४) नवनियुक्त उमेदवाराने प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत पदस्थापनेच्या ठिकाणी रूजु व्हावेत. जर ते विहीत मुदतीत पदस्थापनेच्या ठिकाणी रूजु झाले नाहीत तर त्यांचे नाव प्रतिक्षा/निवड यादीतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

०५) नवनियुक्त उमेदवार संबंधीत आस्थापनेवर रूजु झाले किंवा कसे याबाबतचा अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुखांनी जिल्हा न्यायालयास सादर करावा.

(signature) 21.5.21
( व्ही. व्ही. बांबर्डे )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.

जा.क्र.आस्था/ब–४/ 2228 /२०२१.
जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी.
दिनांक : 29 / 04 /२०२१.

याची एक प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत :

०१– दिवाणी न्यायाधीश क. स्तर, हिंगोली/कळमनुरी.
०२– प्रबंधक, जिल्हा न्यायालय, परभणी.
०३– स्वीय सहायक, जिल्हा न्यायालय, परभणी.
०४– अधिक्षक (आस्थापना विभाग) जिल्हा न्यायालय, परभणी.
०५– सहायक अधिक्षक (रोखा व वित्त) जिल्हा न्यायालय, परभणी.
०६– श्री. शिवाजी गणेश कुबडे, रा. कुबडे निवास, बस स्टॅन्ड जवळ, परभणी. (भ्रमणध्वनी क्र. ८७७९१७८४१८)
मार्फत : दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परभणी.
०७– श्री. राजाचंद्रसेन शंकरराव जंगले, रा. महात्मा फुले नगर, कोद्री रोड, गंगाखेड जि. परभणी. (भ्रमणध्वनी क्र. ९९२१९३०७७१)
मार्फत : दिवाणी न्यायाधीश व. स्तर, गंगाखेड.
०८– संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, परभणी यांना देवुन निर्देशीत करण्यात येते की, सदर कार्यालयीन आदेश जिल्हा न्यायालय, परभणीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

(signature) 21.5.21
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.